संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३८७/२०२२

नि. २४ लगत

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १</u>**

**<u>स्नेहा सुधाकर लंगवे</u>**

**<u>शपथेवर सुरु</u>**

**<u>पुढील सरतपास फिर्यादीतर्फे वकील श्री. डी. व्ही. ठाकुर यांचेतर्फे</u>**

**१३.** माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील संपूर्ण मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिला असून तो खरा व बरोबर आहे. सदर केसकामी मी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

१. आरोपीने मला दिलेला दिनांक १५/०७/२०२२ रोजीचा सारस्वत को–ऑपरेटव्ही बँक शाखा कणकवली या बँकेचा आरोपीच्या खात्याचा रक्कम रुपये ३,००,०००/– चा मुळ धनादेश क्र. ०३९६५५ दाखल केला आहे. त्यावर आरोपीची सही आहे. सही मी ओळखते. मुळ धनादेशास **<u>नि. २५</u>** देण्यात येत आहे.

२. सदर धनादेश मी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवती बँक शाखा सावंतवाडी येथे माझ्या खात्यावर वटण्याकरीता भरला असता तो दिनांक २८/०७/२०२२ रोजी न वटता परत आला. त्याबाबतचा चेक रिटर्न मेमो अभिलेखावर दाखल केला आहे. त्यावर बँकेचा सही , शिक्का आहे. त्यास **<u>नि. २६</u>** देण्यात येत आहे.

३. त्यामुळे मी दिनांक ०४/०८/२०२२ रोजी आरोपीला धनादेशाची रक्कम मागण्याकरीता वकीलांमार्फत नोटीस पाठविली. सदर नोटीसीची स्थळप्रत मी दाखल केली आहे. त्यावर वकीलांची व माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. २७</u>** देण्यात येत आहे.

४. मी आरोपीला नोटीस पाठवल्याबाबतची पोष्टाची पावती दाखल केली आहे. त्यास **<u>नि. २८</u>** देण्यात येत आहे.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३८७/२०२२

नि. २४ लगत

५. आरोपीला नोटीस मिळाल्याबाबतची दिनांक ०६/०८/२०२२ रोजीची पोहोच पावती अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर पोष्टाचा शिक्का आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि. २९** देण्यात येत आहे.

६. गांव मौजे ओसरगांव, ता. कणकवली येथील गट क्र. २०९२/अ, २०९२/ब व २०९२/क या मिळकतींसंदर्भात दिनांक ८/३/२०२१ रोजी माझ्या व निलेश आंगणे यांच्यामध्ये झालेल्या कराराची छायांकित प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदर कराराची मुळ प्रत स.के.क्र. ३९१/२०२२ मध्ये दाखल करण्यात आली आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपी गैरहजर. आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(जे.एम. मिस्त्री )

दिनांक- ०५/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, सावंतवाडी.